# महामेट्रोतर्फे  पर्यावरण संवर्धनासाठी विविध उपाययोजना




**पुणे , १२ डिसेंबर २०१९** : महामेट्रो पुण्यामध्ये गेल्या २ वर्षांपासून मेट्रो रेल बांधकामाचे कार्य करत आहे. पीसीएमसी ते स्वारगेट  आणि वनाज ते रामवाडी असे दोन मार्गिकांमध्ये बांधकाम चालू आहे. या दोन्ही मार्गिकांची एकत्रित लांबी ३१ किमी आहे. मेट्रोच्या आगमनानंतर मेट्रो प्रवाशांएवढ्या गाडयांची संख्या पुण्यातील विविध रोडवरून कमी होणार आहे. त्यामुळे प्रदूषण नियंत्रणाला मोठा हातभार लागणार आहे. सार्वजनिक वाहतुकीचा जास्तीत-जास्त  वापर करण्यासाठी मेट्रोने मल्टिमोडल इंटिग्रेटेड हब ध्यानात ठेऊन  पीएमपीएमएल , एमएसआरटीएस व रेल्वे  स्थानकांना जोडण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. त्यात मुख्यतेकरून पादचारी पूल , सरकते जिने , भूमिगत पादचारी मार्ग याद्वारे पीएमपीएमएल बसस्थानके , एस टी स्थानके , रेल्वे यांना जोडण्यात  येणार आहे. लास्ट माईल  कनेक्टिव्हिटी  या योजनेअंतर्गत   मेट्रो फीडर बस सेवा , इ - रिक्षा , सायकल इ. सुविधा काही मेट्रो स्थानकानाच्या जवळ उपलब्ध करून देणार आहे.  यामुळे  रस्त्यावरच्या वाहनांची संख्या नियंत्रित ठेवण्यास मदत होणार आहे.


महा मेट्रो
PUNE METRO
Transplanted Trees
Helpline No. 18002705501 | /MetroRailPune @metrorailpune metrorailpune www.punemetrorail.org




मेट्रो स्थानके व मेट्रोचे डेपो इथे मोठ्या प्रमाणावर सौर पॅनेल बसविण्यात येणार आहे. साधारणतः ११ (MW) मेगा वॅट एवढ्या विजेची निर्मिती या सौर पॅनेलद्वारे नियोजित आहे. मेट्रोच्या उन्नत मार्गावरील साचलेल्या पावसाचे पाणी रेन वॉटर हार्वेस्टिंग तंत्रज्ञानाद्वारे जमिनीत सोडण्यात येणार आहे. त्यामुळे जमिनीखालील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होणार आहे. मेट्रो ट्रेन कोच धुण्यासाठी ऑटोमॅटिक कोच वॉशिंग प्लान्टची व्यवस्था करण्यात येणार आहे. या प्लान्ट मध्ये पाण्याचा पुनर्रवापर करण्याची यंत्रणा असणार आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याची बचत करण्यात येईल. या व्यतिरिक्त मेट्रो स्थानके व इतर ठिकाणी बायोडायजेस्टर लावण्यात येणार आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याची बचत होणार आहे. मेट्रोने आतापर्यंत १४६४५ नवीन झाडांची तळजाई , आकुर्डी इको पार्क , सहयोग केंद्र , आकुर्डी मेट्रो इको पार्क , खराडी एफएस न. ७४ , आर्मी कॅम्पस पिंपळे निलख , डेक्कन कॉलेज कॅम्पस या विविध ठिकाणी रोपण करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त मेट्रो कामात येणाऱ्या १६८१ झाडांना वाचविण्यात आले असून त्यांचे पुनर्रोपण कासारवाडी एस टी पी , फॉरेस्ट ए. आर. ए. आय., अहमदनगर रोड साईड, डेक्कन एम्ब्रॉआयरी , रेंज हिल , के ई एस गुरुकुल , पी. डब्लू.डी. ऑफिस, येरवडा ओपन जेल, बंड गार्डन , पीएमसी बंड गार्डन , नगर रोड , आरे डेरी बस स्टॅन्ड जवळ

, आळंदी , एम. एस. आर. टी. एस.  बस डेपो , ऍग्री कल्चर कॉलेज , रेंज हिल , वनाज कचरा डेपो  या ठिकाणी करण्यात आले आहे. मेट्रो कामादरम्यान धूलिकणांवर नियंत्रण ठेवण्यासाठी  मेट्रो बांधकामाच्या जागां मधून बाहेर पडणाऱ्या  सर्व वाहनांची चाके धुण्यात येतात जेणेकरून रस्त्यावर माती , चिखल , व धूळ  जाणार नाही.

महामेट्रो पर्यावरण संवर्धनासाठी बांधील असून विविध उपाययोजनाद्वारे  पर्यावरण संवर्धनाचे काम करत आहे.